**<u>ठळक बातम्या</u>**

- देशात धनत्रयोदशीच्या पावन पर्वाने दिवाळी सणाला सुरूवात, प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

- देशातला नक्षलवाद लवकरच संपुष्टात आणण्याची प्रधानमंत्र्यांची ग्वाही

- लखनौ इथं संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत ब्राह्मोस क्षेपणास्त्राचं लोकार्पण

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी

- फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याची अटक योग्य असल्याचा बेल्जियमच्या न्यायालयाचा निर्वाळा

**आणि**

- महाराष्ट्रात नंदूरबार इथं रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू २८ जण जखमी

**<><><><><>**

देशात धनत्रयोदशीच्या पावन पर्वाने आज दिवाळी सणाला सुरूवात झाली. या दिवशी धन्वंतरी, कुबेर आणि माता लक्ष्मीची पुजा केली जाते. तसंच सोन्या-चांदीची खरेदीही केली जाते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी धनत्रयोदशीनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि आरोग्य राहो अशी प्रार्थना प्रधानमंत्र्यांनी केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान धन्वंतरी यांचे आशिर्वाद सर्वांवर राहोत, अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. माता लक्ष्मी आणि भगवान धन्वंतरी यांच्या आशिर्वादाने सर्वांच्या जीवनात आनंद, आरोग्य आणि प्रगतीचा दीप प्रज्वलित राहो, अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

देशातला नक्षलवाद लवकरच संपुष्टात आणणार असल्याची ग्वाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. ते काल नवी दिल्ली इथं एका खासगी वृत्तसंस्थेनं आयोजित केलेल्या जागतिक शिखर परिषदेत बोलत होते. आपल्या सरकारनं सुरुवातीपासूनच दिशाभूल झालेल्या तरुणांना मुख्य प्रवाहात परत आणण्यासाठी पूर्ण संवेदनशीलतेनं काम केलं आहे. त्यामुळेच आज देशात नक्षलवादानं प्रभावीत जिल्ह्यांची संख्या केवळ ११ वर आली असून, केवळ मागच्या काही दिवसांतच ३०३ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड - PM MAOIST**

आज संपूर्ण जग भारताकडे एक विश्वासार्ह, जबाबदार आणि लवचिक भागीदार म्हणून पाहत असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. आज देशात इलेक्ट्रॉनिक्स, औषधननिर्माण, ऑटोमोबाईल, मोबाईल अशा प्रत्येक क्षेत्रात गुंतवणुकीची लाट उसळली असल्याचं त्यांनी  आज भारतात येत आहे. ही गुंतवणूक भारताला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्रस्थान बनवायला मदतीची ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या लखनौ इथल्या ब्राह्मोस एअरोस्पेस युनिटमधे तयार झालेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि उत्तप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत झालं. या युनिटमधे क्षेपणास्त्र निर्मिती ते चाचणीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया पार पडतात. ब्राह्मोस हे केवळ क्षेेपणास्त्र नाही तर भारताच्या वाढत्या स्वदेशी उत्पादन क्षमतेचं प्रतीक आहे,

असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. ब्राह्मोसमधे अत्याधुनिक प्रणाली असून ते लांबपल्ल्यावर मारा करू शकतं. वेग, अचूकता आणि शक्ती हे याचं वैशिष्ट्य असल्याचं संरक्षण मंत्री म्हणाले. ब्राह्मोस टीमनं नुकतेच दोन देशांशी चार हजार कोटींचे करार केल्याचंही संरक्षण मंत्र्यांनी सांगितलं. यावेळी संरक्षण मंत्र्यांनी बूस्टर इमारतीचंही उद्घाटन केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र नौदल क्षेत्राचा पदभार रिअर ॲडमिरल  शंतनू झा यांनी स्वीकारला आहे. आयएनएस कुंजली इथं काल झालेल्या समारंभात रिअर ॲडमिरल  अनिल जग्गी यांच्याकडून झा यांनी  पदभार  स्वीकारला. राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे पदवीधर असलेले शंतनू झा यांची १ जुलै १९९३ रोजी भारतीय नौदलात नियुक्ती झाली. आय एन एस विक्रमादित्य या विमानवाहू युद्धनौकेवर त्यांनी कार्यकारी अधिकारी पद सांभाळले असून नौकानयनशास्त्र आणि दिशादर्शन यात झा तज्ज्ञ आहेत. नौसेना पदक हा महत्वपूर्ण सन्मान  शंतनू झा यांना प्राप्त झाला आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होणार आहे. पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी  ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. २० ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यासाठी २९० उमेदवारी अर्ज आले आहेत. दुसऱ्या टप्प्यात १२२ जागांसाठी ११ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, इंडिया आघाडीमध्ये अजूूनही जागावाटप निश्चित झालं नाही, त्यामुळे अनेक मतदारसंघात घटक पक्षांचे उमेदवार एकमेकांसमोर उभे आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी लेनिनवादीनं वीस उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यातल्या १४ उमेदवारांनी पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. भाकप मालेनं

त्यांच्या विद्यमान बारा आमदारांना पुन्हा एकदा मैदानात उतरवलं आहे. काँग्रेसनेही आपल्या ४८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

फरार हिरे व्यापारी मेहुल चोकसी याला भारताच्या विनंतीवरून बेल्जियम पोलिसांनी चोकसीला केलेली अटक योग्य असल्याचा निर्वाळा बेल्जियमच्या एका न्यायालयानं काल दिला. त्याच्या भारतात प्रत्यार्पणाच्या प्रक्रियेतलं हे एक मोठं पाऊल मानलं जात आहे. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणात मेहुल चोकसी आरोपी आहे. सीबीआयच्या विनंतीवरून अँटवर्प पोलिसांनी त्याला ११ एप्रिल रोजी अटक केली होती. आता ही अटक योग्य असल्याच्या निर्णयाविरोधात १५ दिवसांच्या आत बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येईल. त्यावर त्याचं भारतात प्रत्यार्पण होणार की नाही, हे ठरणार आहे.

**<><><><><>**

नंदुरबारच्या चांदशैली घाटात एका खासगी वाहनाला झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २८ जण जखमी झाले आहेत. यापैकी १५ जणांची प्रकृती गंभीर आहे. अस्तंबा यात्रेहून परतत असताना हा अपघात झाला.

**<><><><><>**

मुंबई उच्च न्यायालयाने अभिनेता अक्षय कुमार याला तात्काळ प्रभावाने हंगामी व्यक्तिमत्व संरक्षण प्रदान केलं आहे. याद्वारे न्यायालयाने समाज माध्यम मंच, ई-कॉमर्स संकेतस्थळं आणि ए आय निर्मित चित्रफीत निर्मात्यांना त्याचं नाव, प्रतिमा, साम्यस्थळं आणि आवाज वापरण्यावर प्रतिबंध घातले आहेत. डिजिटल मंचाच्या माध्यमातून आपली प्रतिमा अवैधरित्या मलिन करण्याविरोधात अक्षय कुमार यानं वाणिज्यिक आय पी याचिका दाखल केली होती. याची दखल घेत ए आय चा वापर करून बनवलेल्या आभासी प्रतिमा आणि व्हिडिओ यांचं वास्तववादी

स्वरूप अत्यंत चिंताजनक असल्याचं निरीक्षण न्यायमूर्ती अरिफ डॉक्टर यांनी नोंदवलं आहे. यामुळे केवळ अक्षय कुमार यांचं केवळ व्यक्तिमत्व आणि नैतिक अधिकारांचं उल्लंघन होत नसून सार्वजनिक सुव्यवस्था आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेलाही गंभीर धोका पोहोचत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

मोझाम्बिक इथं लॉन्च बोट उलटल्याने तीन भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला असून पाच जण बेपत्ता आहेत. बोट समुद्रकिनाजवळ आल्यानंतर ही दुर्घटना घडल्याचं भारताच्या मोझम्बिकमधल्या उच्चायुक्तालयानं सांगितलं. या बोटीत १४ कामगार प्रवास करत होते.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनला लांब पल्ल्याच्या टोमाहॉक क्रूझ क्षेपणास्त्रांचा पुरवठा करण्याबाबत असमर्थता दर्शवली आहे. युक्रेन आणि रशिया मधल्या संघर्षामुळे वाढत असलेल्या जागतिक दबावाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी काल व्हाईट हाऊस इथं युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेंस्की यांची भेट घेतली. अमेरिकेच्या सैन्यालाही या क्षेपणास्त्रांची गरज असल्याचं कारण देत, त्यांनी क्षेपणास्त्र पुरठ्याबाबत असमर्थता व्यक्त केली. युक्रेन आणि रशियानं सध्याच्या युद्धरेषा परिस्थितीचा स्वीकार करून युद्ध थांबवावं असं आवाहनही त्यांनी केलं.

या भेटीत झेलेंस्की यांनी लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या बदल्यात अमेरिकेला ड्रोनचा पुरवठा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. गाझा युद्धबंदी कराराबद्दलही त्यांनी ट्रम्प यांचं अभिनंदन केलं, तसंच अमेरिकेच्या सहकार्यानं हे युद्धही संपवू शकतो असं मत व्यक्त केलं.

<><><><><>

आगामी आशिया प्रशांत क्षेत्र आर्थिक सहकार्य शिखर परिषदेदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांची भेट होण्याची चिन्ह दिसत नसल्याचं दक्षिण कोरियाच्या अमेरिकेतल्या राजदूत कांग क्युंग व्हा यांनी म्हटलं आहे. ट्रम्प आणि किम या दोघांनीही संवाद साधण्याबद्दल सकारात्मकता व्यक्त केली होती, मात्र त्याबातचं कोणतंही ठोस नियोजन अद्यापही समोर आल्याचं दिसत नाही असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

गाझापट्टीत मदत साहित्य घेऊन जाणारं संयुक्त अरब अमिरातीचं जहाज आज रवाना झालं. यात ७ हजार दोनशे टन मदत साहित्य तसंच जीवनावश्यक वस्तू आहेत. त्याचप्रमाणे यात ६८० टन खाद्यपदार्थ, १६० टन निवाऱ्यासाठी उपयोगी पडणारं साहित्य, ३६० टन औषधं आणि पाणी याचाही समावेश आहे.

<><><><><>

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत आज दुपारी भारताच्या सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा उपांत्य फेरीचा सामना जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी या जोडीशी होणार आहे.

<><><><><>

चीन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिनं कांस्यपदक पटकावून इतिहास रचला. या स्पर्धेत पदक मिळवणारी ती पहिली भारतीय कंपाऊंड तिरंदाज ठरली आहे.

//<><><><><>//